महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २१९ वे | दिनांक : ०४/०८/२०२६ | वार : मंगळवार

## नितीन गडकरींच्या घरावर युवक काँग्रेसचा जनआक्रोश मोर्चा; बॅरिकेडिंगवर चढत घोषणाबाजी

**नागपूर :** केंद्र सरकारच्या ई-20 या इथेनॉल मिश्रित पेट्रोल धोरणासह वाढती महागाई, बेरोजगारी आणि नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसने आज आक्रमक पवित्रा घेतला. नागपूरमध्ये केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानावर युवक काँग्रेसने 'जनआक्रोश मोर्चा' काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार झटापट झाली असून, पोलिसांनी बॅरिकेडिंग करून हा मोर्चा मध्येच रोखला व अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले.

या मोर्च्याचे प्रमुख कारण हे केंद्र सरकारचे 'ई-20 इथेनॉल मिश्रित पेट्रोल' धोरण असल्याचे सांगितले जात आहे. या धोरणामुळे सर्वसामान्यांच्या गाड्यांचे इंजिन खराब होत असून, त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. "इथेनॉल निर्मिती करून गाड्यांचे आणि गोरगरिबांचे मोठे नुकसान केले आहे, त्यामुळे नितीन गडकरी यांनी राजीनामा द्यावा," अशी आक्रमक मागणी कार्यकर्त्यांनी केली. यासह महागाई, बेरोजगारी आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याशी जोडला गेलेला 'नीट' पेपरफुटीचा विषय यांवरूनही मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न या आंदोलनाद्वारे करण्यात आला.

या मोर्चामध्ये तरुण वर्गाचा आणि युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. अलीकडेच दिल्लीतील जंतरमंतरवर शिक्षणमंत्र्यांविरोधात झालेल्या आंदोलनाचा संदर्भ देत आंदोलकांनी हातात फलक घेतले होते. "धर्मेंद्र प्रधान तो बस झाकी है, गडकरी-मोदी बाकी है," अशा आशयाचे फलक घेऊन आणि जोरदार घोषणाबाजी करत कार्यकर्ते गडकरींच्या घराकडे निघाले होते.

या आंदोलनाची पूर्वकल्पना असल्यामुळे पोलिसांनी गडकरींच्या निवासस्थानाकडे (देवगिरी बंगल्याकडे) जाणाऱ्या सर्व मार्गांवर म्हणजेच चिटणीस सेंटर ते शिवाजी चौकादरम्यान मोठी नाकेबंदी केली होती. मोर्चेकरी जेव्हा बॅरिकेड्सजवळ पोहोचले, तेव्हा त्यांनी ती तोडण्याचा आणि थेट बॅरिकेड्सवर चढून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी काही कार्यकर्त्यांनी थेट बॅरिकेड्सवर चढून घोषणाबाजी सुरू केली. पोलीस आणि कार्यकर्त्यांमध्ये मोठा संघर्ष पाहायला मिळाला. पोलिसांनी बॅरिकेड्सवर चढलेल्या कार्यकर्त्यांना उचलून थेट पोलिसांच्या व्हॅनमध्ये कोंबले. या झटापटीत पोलिसांनी बळाचा वापर करून आंदोलकांना पांगवण्याचा प्रयत्न केला.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, या मोर्च्याला पोलिसांची पूर्वपरवानगी नव्हती. "युवक काँग्रेसतर्फे काढण्यात आलेल्या या मोर्च्याला कोणतीही परवानगी देण्यात आली नव्हती. त्यामुळे आम्ही सुरक्षेच्या कारणास्तव या सर्व आंदोलकांना ताब्यात घेतले आहे आणि त्यांच्यावर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे," असे पोलिसांनी स्पष्ट केले. यानंतर उर्वरित मोर्चेकऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना पोलिसांनी पुन्हा काँग्रेस भवनच्या दिशेने माघारी पाठवले.

'ई-20' पेट्रोलच्या मुद्द्यावरून सोशल मीडियावर सुरू असलेल्या नाराजीला युवक काँग्रेसने रस्त्यावरील आंदोलनाचे रूप देत थेट नितीन गडकरी यांना लक्ष्य केले. मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने हा मोर्चा त्यांच्या घरापर्यंत पोहोचू शकला नाही.

## राष्ट्रवादीच्या घटनाबदलाची आयोगाकडून चौकशी

**मुंबई :** केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एक पत्र धाडले असून, पक्षाच्या घटनेत करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बदलांबाबत वैध कागदपत्रे आणि अधिकृत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. निवडणूक आयोगाकडून २७ जुलै रोजी पाठवण्यात आलेले हे पत्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या नावे आले आहे. ही एक तांत्रिक आणि कायदेशीर प्रक्रिया असली, तरी पक्षाच्या दृष्टीने ती अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत पक्षाच्या संविधानातील काही प्रमुख कलमांमध्ये दुरुस्त्या करण्यात आल्या होत्या. मात्र, या दुरुस्त्यांना कायदेशीर मान्यता देण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे आयोगाला मिळालेली नाहीत.

निवडणूक आयोगाने आपल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, पक्षाच्या घटनेमधील कलम ६, ७, १२, ३२ आणि ३६ मध्ये करण्यात आलेल्या बदलांना मान्यता देणारे कोणतेही पत्र किंवा ठराव आयोगाला प्राप्त झालेला नाही. या त्रुटीवर बोट ठेवत, आयोगाने आता या सर्व दुरुस्त्यांच्या समर्थनार्थ पक्षाकडून कायदेशीर आणि वैध कागदपत्रे तसेच कार्यकारिणीत संमत झालेले मूळ प्रस्ताव तातडीने सादर करण्याची मागणी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षात मोठे संघटनात्मक बदल झाले होते. पक्षाची पुढील दिशा ठरवण्यासाठी २६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेसची विशेष राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक बोलावण्यात आली होती. याच बैठकीत सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या 'राष्ट्रीय अध्यक्ष' म्हणून एकमताने निवड करण्यात आली होती. अध्यक्षांच्या निवडीसोबतच पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात संविधानातील कलम ६, ७, १२, ३२ आणि ३६ मध्ये काही संघटनात्मक आणि तांत्रिक बदल करण्यात आले होते.

नियमांनुसार, कोणत्याही राजकीय पक्षाच्या घटनेत झालेल्या बदलांची अधिकृत माहिती आणि ठराव निवडणूक आयोगाकडे जमा करणे बंधनकारक असते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसकडून ही माहिती अद्याप पोहोचली नसल्याने आयोगाने हे स्मरणपत्र वजा नोटीस पाठवली आहे.

## FSSAI ची मोठी कारवाई; अनेक ब्रँड्स बंद



**मुंबई :** मद्यप्रेमींसाठी एक अत्यंत धक्कादायक आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. देशातील 'अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने' कडक पावले उचलत बाजारातील काही अत्यंत लोकप्रिय दारूच्या ब्रँड्सवर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईअंतर्गत ओल्ड मॉन्क, रॉयल चॅलेंज, अँटिक्विटी ब्लू आणि बॅगपायपर यांसारख्या तळीरामांच्या आवडत्या मद्य ब्रँड्सच्या काही विशिष्ट प्रकारांच्या विक्रीवर थेट बंदी घालण्यात आली आहे. उत्पादनात कृत्रिम रसायने आणि स्वादांचा वापर केल्याचा ठपका या कंपन्यांवर ठेवण्यात आला आहे.

FSSAI ने केलेल्या सखोल तपासणीत अनेक गंभीर बाबी उघडकीस आल्या आहेत. यामध्ये दारू तयार करताना जी योग्य नैसर्गिक परिपक्वता प्रक्रिया आणि नैसर्गिक घटकांचा वापर होणे अपेक्षित असते, तो या ब्रँड्सच्या काही उत्पादनांमध्ये करण्यात आलेला नाही. त्याऐवजी, मद्याला विशिष्ट चव आणि सुगंध आणण्यासाठी बाहेरील कृत्रिम (Artificial) फ्लेवर्सची भेसळ करण्यात आल्याचे प्रयोगशाळेतील चाचण्यांमध्ये सिद्ध झाले आहे.

भारताच्या अन्न सुरक्षा नियमांनुसार, मद्यामध्ये नैसर्गिक स्वादवर्धक वापरण्यास परवानगी असली तरी, व्हिस्कीमध्ये व्हिस्कीसारखाच किंवा रममध्ये रमसारखाच कृत्रिम स्वाद वरून मिसळणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

ही कारवाई प्रामुख्याने महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये उत्पादित झालेल्या विशिष्ट बॅचेसवर करण्यात आली आहे. महाराष्ट्रात 'मोहन रॉकी स्प्रिंगवॉटर' कंपनीकडून उत्पादित केल्या जाणाऱ्या मद्यप्रेमींमध्ये लोकप्रिय 'ओल्ड मॉन्क' रमच्या तीन विशिष्ट प्रकारांवर बंदी घालण्यात आली आहे.

मध्य प्रदेशात डियाजिओ इंडियाच्या 'युनायटेड स्पिरिट्स'ने उत्पादित केलेली अँटिक्विटी ब्लू व्हिस्की आणि रॉयल चॅलेंज व्हिस्की, तसेच 'इनब्रू बेवरेजेस'ची बॅगपायपर डिलक्स व्हिस्की आणि ओल्ड कास्क डिलक्स XXX रम यांच्या विक्रीवर बंदी घातली आहे.

भारत ही जगातील सर्वात मोठ्या मद्य बाजारपेठांपैकी एक असून, येथील मद्य उद्योगाची उलाढाल वार्षिक ४० अब्ज डॉलर्सच्या घरात आहे. विशेषतः 'डियाजिओ इंडिया' (युनायटेड स्पिरिट्स) ही देशातील सर्वात मोठी मद्य कंपनी मानली जाते. ज्या ब्रँड्सवर सध्या एफएसएसएआयचा (FSSAI) बडगा उगारण्यात आला आहे, ती सर्व मद्ये देशांतर्गत उत्पादित आहेत. परदेशी स्कॉच किंवा प्रीमियम दारूच्या तुलनेत ही दारू स्वस्त असल्याने, भारतात तिची सर्वाधिक विक्री आणि खप होतो.

डायजिओ इंडियाची उपकंपनी युनायटेड स्पिरिट्सने संबंधित उत्पादनांचे लेबल विद्यमान नियमांनुसार असल्याचा दावा केला आहे. हा संपूर्ण उद्योगाशी संबंधित मुद्दा असल्याचे सांगत कंपनीने एफएसएसएआयसमोर भूमिका मांडण्यासह न्यायालयीन मार्गाचाही अवलंब केला असल्याची माहिती समोर आली आहे.

सध्या देशभरात FSSAI कडून अन्न आणि पेयांच्या गुणवत्तेची अत्यंत कठोर तपासणी मोहीम सुरू आहे, त्याच मोहिमेचा एक भाग म्हणून मद्य क्षेत्रातील या बड्या कंपन्यांवर ही धडक कारवाई करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ ऑगस्ट २०२६


## महिला प्रवाशाचा जीव वाचविणाऱ्या वाहक संगीता पालवे यांचा विविध संघटनांकडून गौरव




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : महिला प्रवाशाचा जीव वाचवून मानवतेचे दर्शन घडविणाऱ्या महिला वाहक संगीता पालवे यांचा विविध सामाजिक व राजकीय संघटनांच्या वतीने सत्कार करण्यात आला. साडी, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांच्या धाडसाचा व प्रसंगावधानाचा गौरव करण्यात आला.या सत्कार कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) शहर संघटक अमोल दांडगे, काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष दीक्षा पवार तसेच बुद्धिस्ट विचार मंचाचे सचिव सुदेश पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी उपस्थित मान्यवरांनी संगीता पालवे यांनी दाखविलेल्या धैर्याचे आणि वेळेवर दिलेल्या सीपीआरमुळे एका महिलेचा जीव वाचल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले. समाजात अशा कर्तव्यदक्ष आणि संवेदनशील कर्मचाऱ्यांचा गौरव होणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.बुद्धिस्ट विचार मंचाचे सचिव सुदेश पवार यांनी, "मानवता हाच खरा धर्म" हा संदेश देणारे भगवान तथागत गौतम बुद्ध यांच्या विचारांचे स्मरण करून दिले. तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाची प्रत संगीता पालवे यांना भेट देत त्यांचा विशेष सन्मान केला. संकटाच्या क्षणी जात, धर्म किंवा इतर कोणताही भेद न करता माणसाच्या जीवाला प्राधान्य देणारी कृती हीच खरी मानवता असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले.

## मराठा क्रांती मोर्चा ९ ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर क्रांती चौकातील उपोषणावर ठाम!

**छत्रपती संभाजीनगर** : ऑगस्ट - मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत टिकणारे आणि शाश्वत आरक्षण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी येत्या ९ ऑगस्टपासून क्रांती चौक येथे बेमुदत उपोषण करण्या च्या निर्णयावर मराठा क्रांती मोर्चा ठाम असल्याचे रविवारी सिडकोतील एन-३ येथील शिवछत्रपती महाविद्यालयात झालेल्या बैठकीत स्पष्ट करण्यात आले.यासाठी गेल्या महिना भरापासून जिल्ह्यातील गावोगावी दौरे सुरू असून बैठका घेण्यात येत आहे.सदरील उपोषणाबाबतीत प्रशासनाला 15 दिवसा पूर्वीच परवानगी बाबतीत निवेदन देण्यात आले होते.परवानगी मिळो अथवा न मिळो, आंदोलन नियोजीत तारखे पासून सुरूच राहील,असा निर्धार उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.बैठकीत मराठा समाजाला सध्या मिळालेले एस.ई.बी.सी. आरक्षण टिकवण्यासाठी सरकार कोर्टात सकारात्मक भुमिका घेत नसल्यामुळे निकालच विरोधात जाण्याची स्थिती निर्माण झालेली असतानाही शासन मुग गिळून बसले असुन या मुळे सदरील आरक्षण प्रकरण धोक्यात आलेले असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.तसेच गायकवाड आयोगाच्या माध्यमातून शिफारशी स्वीकारून देण्यात एस.इ बी.सी. आरक्षण बाबतीत न्यायालयात सरकारने तातडीने राज्य सरकारच्या वतीने क्युरिटिव्ह पिटिशन मध्ये त्रुटींची पुर्तता करण्यासाठी आवश्यक पावले उचलली नाहीत तर हे सर्वोच्च न्यायालयातील प्रकरण सुद्धा धोक्याचा उंबरठा ओलांडल्या शिवाय राहणार नाही. हैदराबाद गॅझेटियर नोंदीच्या नावाखाली काढण्यात आलेल्या शासन निर्णयामुळे समाजात संभ्रम निर्माण झाला असून मराठा समाजा ची सभ्रमावस्था वाढत चालली असल्याचा बाब या बैठकीत सर्वांनीच पुढे आणली आहे.उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगितले की,मराठवाड्या तील अनेक मराठा बांधवांनी २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णया नुसार हैदराबाद गॅझेटियर नोंदीच्या आधारे सरसकट मराठवाड्यातील मराठा समाजाला जात प्रमाणपत्र मिळाणार असे शासनाच्या वक्ताव्यामुळे समाजातील बांधवांनी अर्ज केले, मात्र नोंदी व वंशावळ जुळत नसल्याच्या कारणा वरून अनेकांचे अर्ज फेटाळण्यात आले. त्यामुळे संबंधित शासन निर्णय प्रत्यक्षात लागू होत नसल्याचे स्पष्ट झाल्याचा दावा बैठकीत करण्यात आला.त्यामुळे कायदेशीर आणि घटनात्मक दृष्ट्या टिकणाऱ्या आरक्षणा साठी नव्याने संघटित लढा उभारण्याची गरज असल्याचेही मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केले . छत्रपती संभाजीनगर ही मराठा क्रांती मोर्चाची जन्मभूमी असून, शांततेच्या मार्गाने लाखोंचे मोर्चे काढण्याचा आदर्श या जिल्ह्याने देशासमोर ठेवला आहे.त्याच परंपरे तून आरक्षणाच्या लढ्याला नवी दिशा देण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीत मराठा समाजा समोरील सामाजीक, शैक्षणिक,आर्थिकआणि संघटनात्मक प्रश्नांवर तसेच आरक्षणा च्या सद्यस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी पुढील प्रमुख मागण्या मांडण्यात आल्याअण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचा व्याज परतावा,सारथी संस्थेच्या बंद पडलेल्या व नव्याने समाविष्ट होणाऱ्या योजनां बाबत तातडीने निर्णय घेणे,मराठाआंदोलना दरम्यान दाखल झालेले सरसकट गुन्हे तातडीने मागे घेणे,राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी व मराठा कुटुंबांना आर्थिक मदत देऊन कुटुंबा तील एका सदस्याला स्थानिक स्वराज्य संस्थेत नोकरीची संधी देणे,केवळ आंदोलन करून न थांबता, समाजाच्या मागण्यांसाठी विधिमंडळ, संसद आणि न्यायालयीन पातळी वरही प्रभावी घटनात्मक व कायदेशीर लढा उभारण्याची प्रचंड मोठी अशी आवश्यकता असल्याचे मत अनेक वक्त्यांनी व्यक्त केले.आरक्षणासंदर्भात समाजात निर्माण झालेला संभ्रम दूर करण्यासाठी हैद्राबाद गॅझेटियर,एस.ई.बी.सी. आरक्षणा बाबत एकत्रित रित्या भूमिका मांडून समाजाला निर्माण झालेली वस्तुस्थिती स्पष्ट करुन समाजातील संभ्रम दुर करण्याचे आवाहन मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आले.दरम्यान ९ ऑगस्ट पासूनच्या बेमुदत उपोषणासाठी क्रांतीचौकात परवानगी मिळावी यासाठी सोमवारी मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी पोलीस आयुक्तांची भेट घेणार असून,परवानगी बाबत पुढील भूमिका निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

## चतुर कोल्हा

जंगली प्राणी कोल्हा
धुर्त,चलाख फार
वाघ, सिंह, हत्ती
यांचीही होते हार

अंगावर त्याच्या
तपकिरी रंगाचा साज
संकटाला न घाबरणारा
आहे तो डोकेबाज

द्राक्ष आणि ऊस
आवडे त्याला भारी
चतुराईने ठकविण्याची
सवय त्याची न्यारी

कोंबड्या,ससे, मेंढ्या
यांना करतो फस्त
ढेकर देत म्हणतो
जेवण झाले मस्त

युक्तीने सोडवितो तो
भांडण लहान सहान
म्हणून त्याला मिळाला का
चतुराईचा बहुमान?



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## दु:ख दूर सारणारा

प्रत्येकाने एकतरी,
मित्र जपायला हवे.
नाहीतर जीवनात,
एक मित्र करा नवे. १

मनातील साचलेले,
दु:ख दूर सारणारा.
मनातील बोलतांना,
मैत्रीसाठी भांडणारा. २

सुख दु:खात सोबती,
सदा सर्वदा राहतो.
मित्र पुढे गेल्यावर,
आनंदाने तो पाहतो. ३

मैत्री मित्रांची शोभते,
कर्तव्याला जागतांना.
संकटात मदतीला,
स्वतः पुढे धावतांना. ४

मित्र असतो निस्वार्थी,
नात्यावर भाळणारा.
साथ देताना मैत्रीत,
वचनाला पाळणारा. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ ऑगस्ट २०२६

## विद्युत खांबाला नायलॉन दोरीचा आधार



**दौलताबाद (जावेद अहेमद) :** दौलताबाद किल्ल्याच्या पाठीमागे असलेले केसापुरी कॅम्प (ताजी छत्रपती संभाजी नगर)या गावात महावितरण विभागाचा भोंगळ कारभार दिसून येत आहे उपसरपंच ज्ञानेश्वर पवार यांच्या घराजवळ विद्युत खांब हे एकीकडे कलंडले आहे हा धोका लक्षात घेत पवार यांनी ही बाब महावितरण चे शाखा उपअभियंता यांच्याशी फोनवर अनेकदा संपर्क साधला पण काहीच उत्तर न आल्याने कोणीही कर्मचारी वर्ग न आल्याने म्हणून कोणत्याही प्रकारची दुर्घटना होऊ नये यासाठी नायलॉन च्या दोरी आणून त्या खांबाला सपोर्ट म्हणून बांधले आता ती आता ती दोरी किती दिवस तग धरेल हा एक विषय आहे. तसेच या गावात अनेक ठिकाणी विद्युत वाहिनी या झाडांमध्ये अडकल्याने घर्षण होऊन फेस उडते व वेळोवेळी विदुयत पुरवठा खंडित होते. तरी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन अडचणी चे निराकरण करून विद्युत खांब व्यवस्थित लावून विद्युत ताराना स्पर्श करणारी झाडांची फांदी लवकरात लवकर होणारे अडथळे दूर करावे अशी मागणी उपसरपंच ज्ञानेश्वर पवार यांनी केली आहे



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक विभागीय केंद्र छत्रपती संभाजी नगरचे संचालक प्रा. डॉ. नंदकुमार राठी यांचा सत्कार करताना, जेईएस महाविद्यालय जालनाचे प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे.

## सोशल मीडियापासून दूर राहत विद्यार्थ्यांनी ध्येयावर लक्ष केंद्रित करा : सहाय्यक शिक्षण उपसंचालकश्री.सुनील पोलास यांचे प्रतिपादन



***फोटो कॅप्शन :*** *गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याप्रसंगी म.शि. प्र. मंडळाचे सरचिटणीस मा.आ.सतीश चव्हाण, सहाय्यक शिक्षण उपसंचालक श्री.सुनील पोलास, प्राचार्य डॉ.रवी पाटील व उपस्थित मान्यवर*

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालयात बारावी विज्ञान शाखेतील राष्ट्रीय स्तरावरील नीट, या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले सहाय्यक शिक्षण उपसंचालक श्री सुनील पोलास (छत्रपती संभाजी नगर) यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नेपोलियन हिल यांच्या 'द गोल्डन रुल' या ग्रंथातील संदर्भ देत स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवल्यास कोणतीही गोष्ट साध्य करता येते म्हणून सकारात्मक मानसिक दृष्टिकोन ठेवून आपल्या मनाला दररोज सूचना दिल्या पाहिजे आणि आयुष्यात स्पष्ट आणि मोठे ध्येये लिहून ती साध्य करण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न केले पाहिजे या सकारात्मक विचारसरणीमुळेच आव्हानावर मात करणे सोपे जाते त्यामुळे विद्यार्थ्यांनी या दृष्टिकोनांचा जीवनात उपयोग करून सोशल मीडियापासून दूर राहत ध्येयावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत, सातत्य, आणि चिकाटी ठेवल्यास जीवनात हमखास यश मिळते.राष्ट्रीय पातळीवरील NEET परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून आपल्या विद्यार्थ्यांनी केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे तर महाविद्यालयाचे आणि संपूर्ण समाजाचे नाव उज्ज्वल केले आहे. NEET ही परीक्षा केवळ ज्ञानाची नव्हे तर संयम, चिकाटी, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाची परीक्षा असते. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे पाठबळ यांचा मोठा असतो.नियमित अभ्यास, योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि स्वतःवर असलेला विश्वास यांमुळेच हे यश मिळते आणि तुमच्या यशामुळे अनेक विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी मेहनत करण्याची प्रेरणा मिळेल असे प्रतिपादन केले.याप्रसंगी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.रवी पाटील यांनी महाविद्यालयाची उज्ज्वल यशाची परंपरा सांगून विज्ञान शाखेतील नीट परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा निकाल महाविद्यालयाच्या यशात भर घालणारा ठरला असून महाविद्यालयाने निकालाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांची बुद्धी, अचूकता, वेळ आणि निर्णयक्षमतेची कसोटी लागलेली असते या सर्व कसोट्यामध्ये देवगिरीचे विद्यार्थी खरे उतरले आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा.आ. सतीश चव्हाण हे होते.यावेळी देवगिरीJEE, NEET सेलचे संचालक, उपप्राचार्य प्रा.अरुण काटे यांनी आपल्या मनोगतात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात उत्तम दर्जाच्या सुविधा निर्माण केल्या असून त्यांना सकस आणि पोषक वातावरण निर्माण करून देण्यासाठी अग्रक्रमाने विचार केला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांच्या कौतुक करणे, त्याचा सन्मान करणे ही सत्कार सोहळ्याची भूमिका असून विद्यार्थ्यांनी पालक,शिक्षक आणि समाजाचा आदर्श पुढे ठेवून सकारात्मकपणे आपल्या पुढील आयुष्याची पावले उचलावी आणि आपल्या जाणीवा समृद्ध कराव्या असे प्रतिपादन केले. यावेळी नीट परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. रवी पाटील देवगिरी JEE NEET सेलचे संचालक तथा उपप्राचार्य प्रा. अरुण काटे उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर हिवरेप्रा. विजय नलावडे क्रॉप सायन्स विभागप्रमुख प्रा. आशा करंडे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी स्नेहल वायाळ(595),तन्मय शहाणे(585) सिद्धी तौर,(582)आर्यमन मारावार(576)अद्विता लंबे,(560)उन्मनी धोत्रे(555), ग्रीष्मा चव्हाण,(552) शुभम बाविस्कर(549)सिद्धी तौर,(542) नंदिता दोरकत (523,)ईशा जमालपूरे,(509)पल्लवी खानझोडे,(489)विदिशा जोंधळे (477),मिताली पाध्ये(, 469)कृष्णाई दहातोंडे(462 )वैष्णवी तांबे(447) माधवी वाणी (440)यागुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.जिजा शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्रॉप सायन्स विभागप्रमुख प्रा.आशा करंडे कार्यालयीन अधिक्षक श्री.मेघराज पंडित, डॉ. संतोष भोसले, प्रा.उज्वला भोसले,प्रा.वंदना जाधव पाटील,डॉ. मनिषा नाईक ,प्रा. सुलक्षणा होळकर, प्रा.नीलिमा वाबळे प्रा.भाग्यश्री तुपे ,प्रा. सुरज सोनवणे यांनी परिश्रम घेतले.

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ ऑगस्ट २०२६


## भारत टॅलेंट सर्च परीक्षा २०२६ : ८५ गुणवंत विद्यार्थ्यांचा दिमाखदार गौरव




**छत्रपती संभाजीनगर** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) नुसार विद्यार्थ्यांना जीवनाभिमुख शिक्षणाची प्रेरणा देणाऱ्या एजुमिट अकॅडमी महाराष्ट्र आयोजित भारत टॅलेंट सर्च परीक्षा २०२६ चा छत्रपती संभाजीनगर तालुकास्तरीय पारितोषिक वितरण समारंभ रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला.या समारंभात पिसादेवी, मुरूमखेडा, पाटोदा व लाडसावंगी केंद्रांतील जिल्हा व केंद्रस्तरावर रँक प्राप्त करणाऱ्या तब्बल ८५ गुणवंत विद्यार्थ्यांचा ट्रॉफी, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचा आनंद, पालकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे संपूर्ण सभागृहात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.समारंभाच्या अध्यक्षस्थानी क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त श्रीमती स्वाती भगवान गवई या होत्या. प्रयोगशील शिक्षक श्री. भरत काळे यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि यशासाठी आवश्यक असलेल्या जिद्द, सातत्य व आत्मविश्वासाचे महत्त्व प्रभावी शब्दांत पटवून दिले. त्यांच्या प्रेरणादायी व दमदार भाषणाने उपस्थित विद्यार्थी, पालक आणि शिक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.प्रमुख पाहुणे श्री. बाबासाहेब मंदाडे सर यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती स्वाती भगवान गवई यांनी केले, तर श्रीमती मिनाक्षी राऊत यांनी उत्कृष्ट आणि प्रभावी सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची रंगत अधिक खुलवली.यावेळी श्रीमती विद्या गवई, श्रीमती जागृती ढोकळे, श्रीमती उज्वला बोराडे, श्रीमती सुरेखा बोरसे, श्रीमती वैशाली लहाने, श्रीमती सविता पाटील, श्रीमती रुपाली गवई, श्रीमती कविता चौधरी, श्री. आबासाहेब चौधरी, श्री. मांडे सर, श्री. बैनाडे सर, श्री. नानासाहेब मोहिते सर, श्रीमती अनिता भटकर, श्रीमती रेखा भोसले, श्रीमती आशा हुंबे तसेच विविध शाळांचे शिक्षक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या टाळ्यांच्या कडकडाटात पार पडलेला हा गुणवंतांचा गौरव सोहळा सर्वांच्या स्मरणात राहील असा प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांनी सर्व मान्यवर, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि उपस्थितांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा




**जालना** : मेरा युवा भारत (MY Bharat), युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय 'नशामुक्त भारत' नुक्कड नाट्य स्पर्धा दि. २९ जुलै २०२६ रोजी डॉ. वेदप्रकाश पाटील आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र, जालना येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना येथील संघाने उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

पल्लवी धनगर यांच्या नेतृत्वाखालील संघाने "ज़िंदगी चुनो, नशा नहीं" हे नुक्कड नाटक प्रभावीपणे सादर केले. सामाजिक आशय, वास्तववादी कथानक, दमदार अभिनय आणि प्रभावी संवादफेकीमुळे या नाटकाने परीक्षकांसह उपस्थित प्रेक्षकांचीही विशेष दाद मिळवली. या नाटकातून तरुणांमध्ये वाढत चाललेल्या व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम, चुकीच्या संगतीमुळे व्यसनाच्या आहारी जाण्याची प्रक्रिया, त्याचे कुटुंबावर होणारे मानसिक व आर्थिक परिणाम आणि व्यसनाधीन युवकाचे उद्ध्वस्त होणारे जीवन यांचे वास्तवदर्शी चित्रण करण्यात आले. तसेच डॉक्टर, पोलीस आणि समाज यांच्या सामूहिक प्रयत्नांतून व्यसनमुक्त जीवनाचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला. नाटकाच्या शेवटी "नशा छोड़ो, जीवन जोड़ो", "स्वस्थ युवा, सशक्त भारत" आणि "नशामुक्त भारत — आपला संकल्प" या घोषणांनी उपस्थितांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती घडवून आणली.

विजयी संघात पल्लवी धनगर (संघप्रमुख), यशराज बायस, रोहित स्वामी, पायल जाधव, नम्रता ठाकूर, पायल खरात, विश्वजीत नवले, मंदार गीते आणि विपुल डोईफोडे यांचा सहभाग होता. सर्व कलाकारांनी आपल्या प्रभावी अभिनयाच्या जोरावर नाटकाला प्रभावी उंची प्राप्त करून दिली.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालय परिवारात आनंदाचे वातावरण असून विजेत्या संघाचे अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संघाला शुभेच्छा देण्यात आल्या असून हा विजय महाविद्यालयाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकीचा गौरवशाली ठसा उमटवणारा ठरला आहे. या यशाबद्दल प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.ओमप्रकाश चव्हाण, डॉ. स्वाती पुरी, डॉ. रामेश्वर मस्के, डॉ.निधी तिवारी, प्रा.कांचन कायंदे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## दौलताबाद येथे सय्यद मोमीन आरीफ यांच्या १००१ व्या उर्सानिमित्त भव्य संदल मिरवणूक उत्साहात




**दौलताबाद (जावेद अहेमद)** : दौलताबाद येथील हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक प्रसिद्ध सय्यद मोमीन आरीफ रहमतुल्लाह अलेह यांच्या १००१ व्या उर्स निमित्त दि ०३ ऑगस्ट सोमवारी रोजी संदल मिरवणूक ऐतिहासिक दौलताबाद किल्ल्या समोरील दर्गाह हजरत चांद शाह बोधले रहमतुलाह अलेह यांच्या दर्ग्यापासून गुरुवारी रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास सुरवात होऊन संदल दौलताबाद बस स्टँड , सय्यदवाडी,कुंभारगल्ली,अब्दीमंडी पासून ढोल ताश्या व बँडच्या गजरात सैय्यद वाडी,रतनजी मोहला,कुरेशी मोहल्ला, अब्दीमंडी येथील युवकांनी चादरी सजवून बँड च्या गजरात सामील होऊन संदल रात्री अकरा वाजता दर्गा येथे पोहचला या संदल मध्येकाही जणांनी आपले बाळाचे नवस साखर तुला पेढे तुला करून करण्यात आले जिल्हा भरातील तसेच मुंबई,पुणे,हैद्राबाद,बदायु ,गुलबर्गा अश्या अनेक राज्य व परराज्यतील भाविक सहभागी झाले होते चढवल्या नंतर लंगर (महाप्रसाद) महेफिले समा, सामूहिक कुराण पठण झालेयानंतर जिल्हा भरातून आलेल्या कव्वालानी आपल्या कव्वाली सादर केल्यायावेळी उपसरपंच सैय्यद मतीन,पोलीस निरीक्षक नितीन खडागळे,उपनिरीक्षक अशोक सोनवणे व दर्गाह मुतवली शेख मोइनोदीन, शेख सुलतान,शेख अहेमद,शेख रईस, शेख नदीम ,शेख अमीर,शेख सलिम, शेख खुसरो, शेख झिया,सय्यद शफीक,तसेच पंचकृषितील सर्व धर्मातील भाविक उपस्थित लोक उपस्थित होते


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ ऑगस्ट २०२६


## देशात नव्या क्रांतीची नांदी विचारांनीच लढावी लागेल




**कन्नड (अरुण थोरात) :** शेतकरी नेते तथा भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय प्रवक्ते राकेश टिकेत हे नांदेड येथील नियोजित कार्यक्रमासाठी जात असताना दि.02 आगस्ट रोजी कन्नड येथे काही काळासाठी शेतकऱ्यांच्या आग्रहखातर थांबले. मॅक्स मेन्स हबच्या कार्यालयात यावेळी त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी अत्यंत मोकळ्या वातावरणात संवाद साधत विविध मुद्द्यांवर दिलखुलास चर्चा केली.नवी दिल्लीतील पेपरफुटी प्रकरणी 'जंतर-मंतर' येथे सुरु असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला भारतीय किसान सभेने दिलेल्या पाठिंब्याबाबत बोलताना त्यांनी समाधान व्यक्त केले. "देशातील तरुण पिढी स्वतःच्या न्याय्य हक्कासाठी इतक्या मोठ्या संख्येने आणि ताकदीने रस्त्यावर उतरत आहे, हे देशाच्या उज्ज्वल भविष्याचे लक्षण असून त्यांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे" असे टिकेत या वेळी म्हणाले. देशातील प्रशासकीय यंत्रणा आणि परीक्षा पद्धतींमधील वाढत्या गैरप्रकारांवर बोट ठेवताना टिकेत यांनी चिंता व्यक्त केली. ते म्हणाले,"आज सर्वच पातळ्यांवर सिस्टिम ढासळत चालली आहे. पेपरफुटीसारख्या प्रकारांमुळे कष्टकरी मुलांचे भवितव्य अंधारात सापडत आहे. त्यामुळे आता केवळ मोर्चे काढून चालणार नाही, तर संपूर्ण 'सिस्टिमला मॉनिटर' करण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. जनता जेव्हा सिस्टिमवर बारीक लक्ष ठेवेल, तेव्हाच या कारभारात पारदर्शकता येईल."'जेन-जी' आणि अनुभवी पिढी एकत्र आल्यास क्रांती निश्चित होईल. देशात सध्या एका नव्या क्रांतीची सुरुवात झाली असल्याचे सांगत राकेश टिकेत यांनी संघर्षाची नवी दिशा स्पष्ट केली. "ही लढाई केवळ शारीरिक ताकदीने लढून जिंकता येणार नाही, तर ती विचारांनी आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने लढावी लागेल" असा मोलाचा सल्ला त्यांनी आंदोलकांना दिला.आजची नवी 'जेन-जी' पिढी तंत्रज्ञान आणि नवीन विचारांनी समृद्ध आहे. जर आमच्या पिढीचा प्रदीर्घ संघर्षाचा अनुभव आणि आजच्या तरुण पिढीची आधुनिक ऊर्जा व वैचारिक ताकद एकत्र आली, तर देशात निश्चितच मोठा आणि सकारात्मक बदल घडून येईल, असा विश्वास त्यांनी या वेळी व्यक्त केला. कन्नड तालुक्यातील शेतकऱ्यांनी राकेश टिकेत यांचे जंगी स्वागत केले. शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी कृषी क्षेत्रातील सध्याच्या अडीअडचणी, पिकांचे भाव आणि सरकारी धोरणांवरही भाष्य केले. शेतकरी आणि कष्टकरी वर्ग एकत्र आल्याशिवाय देशातील अर्थव्यवस्थेला खरा आकार मिळू शकत नाही, असे सांगत त्यांनी भविष्यातील आंदोलनाची रूपरेषा अभ्यासपूर्ण असेल यावर भर दिला. या प्रसंगी त्यांच्यासोबत भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय महासचिव युद्धवीर सिंह, महाराष्ट्र अध्यक्ष चंद्रशेखर नलावडे, महाराष्ट्र महासचिव रुपाली पाटील, खान्देश संघटन मंत्री पुरुषोत्तम पाटील, खान्देश संपर्क प्रमुख भूषण दोडके, महासचिव टिनू चौधरी, बुंदेलखंड प्रभारी सुंदर बलियाण, राज्य कार्यकारिणी सदस्य विजयाभिनंदन धुमाळ आदी प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी आदर्श शेतकरी साहेबराव दाबके, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. अण्णा शिंदे, डॉ राजेंद्र नेवगे, माजी उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील, दामोधर थोरात, मुंडवाडीचे प्रगतीशील शेतकरी भाऊसाहेब शिंदे, सुरेश जाखड,अंधानेरचे सरपंच अशोकराव दाबके, प्रकाश आहेर, जयसिंग जाखड, फकिराराव नेवगे, संजय जाखड, किसनराव जाधव परिसरातील शेतकरी, स्थानिक कार्यकर्ते आणि तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. राकेश टिकेत यांच्या या दिलखुलास संवादाने स्थानिक शेतकरी आणि युवकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.






## लेखनातून समाजाचे वास्तव मांडण्याचा संदेश; बिडकीन कला महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन




**बिडकीन :** एकता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला महाविद्यालय बिडकीन "मराठी विभाग व भाषा वाङ्मय मंडळ तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लेखन प्रेरणा दिन त्याचबरोबर भाषा वाङ्मय मंडळाचे उद्घाटन आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून भव्य वृक्षारोपण व स्वच्छता पंधरवडा दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाला प्रमुख वक्ते डॉ. दैवत सावंत हे लाभले होते त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने लेखन प्रेरणा दिवस साजरा करण्यासंदर्भात शाळा महाविद्यालय यांना सूचना दिलेल्या आहेत त्यानुसार अण्णाभाऊ साठे हे फार मोठे साहित्यिक असून त्यांच्या अनुभवातून लेखन करत असताना उपेक्षित ,शोषित आणि समाजातील वास्तव व विदारक चित्रण त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून केलेले आहे त्यांच्या कथा ,कादंबऱ्या, त्याचबरोबर प्रवास वर्णन याविषयी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले अण्णाभाऊ साठे यांनी पृथ्वीही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती कामगारांच्या व शोषितांच्या तळहातावर तरलेली आहे असे आवर्जून सांगत साहित्य आणि समाज यांचा संबंध कशा पद्धतीने असतो यातून समाजामध्ये जीवन जगत असताना व तुम्ही महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना महाविद्यालयांमध्ये भाषा वाङ्मय मंडळ कार्यरत असते म्हणून समाजामध्ये वेगवेगळे प्रश्न, वेगवेगळ्या समस्या ,वेगवेगळी संस्कृती पहावयास मिळते याचे दर्शन साहित्यातून घडत असते आणि तुम्ही सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी समाजाचे घटक आहात म्हणून तुम्ही अण्णा भाऊ साठेची जयंती साजरी करत असताना महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना आपल्या समाजाचे चित्रन लेखणीच्या माध्यमातून उतरवण्याची गरज असते असे संबोधित केले या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक स्वयंसेविका तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षेकतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांच्या माध्यमातून भव्य वृक्षारोपण, महाविद्यालय परिसर स्वच्छता अतिशय आनंदीमय वातावरणात कार्यक्रम पार पडला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ.युसुफ पठाण सरांनी भूषवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . नितिन आहेर सर यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लेखन प्रेरणा दिवसाच्या विद्यार्थी विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. अर्चना काटकर मराठी विभागप्रमुख यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मिलिंद ठोकळे यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ .मुखत्यार शेख सर यांनी केले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित राहिल्यामुळे कार्यक्रम अतिशय उत्साही वातावरणात पार पडला

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ ऑगस्ट २०२६


## कन्नड येथील नेत्ररोग तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**कन्नड (अरुण थोरात) :** शहरातील नगरपालिकेच्या महिला प्रबोधिनी हॉल येथे नगराध्यक्ष फरीन बेगम यांच्या पुढाकाराने व लायन्स क्लब ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले मोफत नेत्ररोग तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष फरीन बेगम यांच्या हस्ते करण्यात आले. नगराध्यक्ष फरीन बेगम म्हणाल्या की राजकारणाबरोबर समाजसेवेची सुद्धा माणसाला गोडी असावी समाजकार्यातूनच जनतेची सेवा होती हेच माझं भाग्य आहे मी माझ्या सात महिन्याच्या कार्यकाळात ही तिसरी शिबिर आयोजित करीत आहे नेत्र तपासणीमुळे राजकारणी लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन बदलून जाईल व त्यांना स्वच्छ शहर व सुंदर शहर दिसेल असे म्हणाले.या शिबिरामध्ये कन्नड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत आपल्या डोळ्यांची तपासणी करून घेतली. नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून नेत्र रोगांबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच आवश्यक उपचार व पुढील वैद्यकीय सल्लाही देण्यात आला. या शिबिरामध्ये 630 लोकांनी नेत्र तपासणी करून घेतली.या उपक्रमामुळे ग्रामीण व शहरी भागातील अनेक नागरिकांना मोफत नेत्र तपासणी ची सुविधा उपलब्ध झाल्याने नगराध्यक्ष फरीन बेगम यांचे आभार व्यक्त केले. या प्रसंगी माजी उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील, वाल्मीक लोखंडे, प्रकाश गर्जे पाटील, नगरसेवक संदीप घोंगटे, नगरसेवक अजिज मेंबर, राजू भाई कमिटी, पाणीपुरवठा विभागाचे बाजीराव थोरात, हिना शेख, उज्वला सातदिवे, सामाजिक कार्यकर्ते गोकुळ राठोड, युवा नेते आबेद अली,समाजसेवक यासीन शेख,तसेच नगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. लायन्स क्लबचे नेत्र तपासणी तज्ञ सचिन आडे शिबिर कॉर्डिनेटर, डॉ मंथन बहर, डॉ धनश्री घुगे, भरत पटणकर टेक्निशियन, रोहन शिंदे टेक्निशियन, त्यांनी रुग्णाची तपासणी केली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजी नगर, नगरपरिषद प्रशासन व सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी अशा आरोग्यविषयक उपक्रमांची समाजात सातत्याने आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

## 'मिलिंद' मध्ये आलो नसतो तर मला बाबासाहेब कळले नसते - जेष्ठ्य लेखक प्रकाश त्रिभुवन




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औरंगाबाद येथे स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयात मी आलोच नसतो तर मला डॉ बाबासाहेब आंबेडकर हे कळालेच नसते. तसेच तथागत गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाकडे वळालोच नसतो व माझ्याहातून 'गणनायिका आम्रपाली' हे नाटक लिहून झाले नसते असे प्रतिपादन ज्येष्ठ्य नाटककार तथा प्रसिद्ध विचारवंत मा.प्रकाश त्रिभुवन यांनी दि. 31/07/2026 रोजी संध्याकाळी. 6:00 वाजता.डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद व मराठी विभाग, डॉ बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'संवाद प्रतिभावंतांशी' या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. नागनाथ करडे हे होते. पुढे बोलतांना प्रकाश त्रिभुवन म्हणाले की, माझे शालेय शिक्षण हे मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूल मध्ये झाले व मी महाविद्यालयीन शिक्षण हे मिलिंद महाविद्यालयात घेतले याच काळात मला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना समजून घेता आले व त्यामुळे मला तथागत गौतम बुद्धांच्या समतावादी तत्वज्ञानाकडेही जाता आले. यामुळेच मला तथागतांच्या काळातील उपेक्षित गणनायिका आम्रपाली या व्यक्तिरेखेला माझ्या नाटकातून न्याय देण्याचा प्रयत्न मी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, दलित रंगभूमी म्हणजे फुले-आंबेडकरांची प्रेरणा आणि त्यांचा समतावादी विचार जनसामान्यांत पेरणारी रंगभूमी आहे. हे कुणीही नाकारू शकणार नाही. या संदर्भातील उदाहरणे देताना त्यांनी आपल्या 'थांबा, रामराज्य येतेय! ' या नाटकाचे झालेले पाचशे प्रयोग आणि त्यामागची तळमळ ही स्वतःची आंबेडकरी विचारांशी असलेली निष्ठाच आहे. त्यांनी अडीच फुटाचा राक्षस, पांगुळगाडा, 'जन नको पण वन हवे' ही बालनाट्य ,बाळकडू (कादंबरी) व 'हे आंबेडकर आमचे नाहीत!', कुळंबीण, मचाळ यासारख्या नाट्यलेखनकलाकृतींचा आढावा मांडला. तसेच या सर्व लेखनाची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर,तथागत गौतम बुद्ध, संत कबीर व महात्मा जोतीराव फुले हेच आहेत असेही प्रतिपादन केले..पुढे त्यांनी आपल्या भाषणात नामांतर चळवळीच्या काळातील नाट्यलेखन, चित्रपट दिग्दर्शनासह 'लढा नामांतराचा' ,'रमाई' व 'माईसाहेब- डॉ.सविता आंबेडकर' यासारख्या चित्रपटांची निर्मिती केली यातून माता रमाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माईसाहेब आंबेडकर यांचा त्याग आणि कष्ट समाजापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केल्याचा मला सार्थ अभिमान आहे असेही ते यावेळी म्हणाले. तरप्रा नागनाथ करडे अध्यक्षीय समारोप करताना प्रा नागनाथ करडे म्हणाले की, "दलित कथा, कादंबरी, कविता, नाटक व आत्मकथन या साहित्यातून दलित समाजाच्या वेदना आल्या आहेत". यावेळी परिषदेचे अध्यक्ष डॉ. मोहन सौंदर्य हे विचारमंचावर उपस्थित होते. . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव डॉ.युवराज धबडगे यांनी केलेतर त्रिभुवन सरांचा परिचय डॉ. सुधाकर नवसागर यांनी केला, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. शिवाजी डोळसे यांनी मानले.यावेळी प्राचार्य डॉ.नवनाथ गोरे, डॉ. मिलिंद वाव्हळे, डॉ रेखा वाघ,डॉ.प्रशांत वंनजे, डॉ बाळासाहेब लिहिणार, पंकज शिंदे, डॉ गौतम होणवडजकर, डॉ. सतीश वाघमारे, डॉ. अभिमन्यू खरात, प्रा. अनिल दंडाळे यांच्यासह शहरातील रसिक, श्रोते उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमांची सांगता करण्यात आली..


MAHARASHTRA JANSHAKTI NEWS.COM

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस


डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ ऑगस्ट २०२६

# अवघाची काळोख : संयत शब्दांकन मनोभूमिकेची अस्सल कविता




कवीवर्य साक्षेपी संपादक 'शब्दांकन' सत्य प्रयाग कुटे यांचा हा कवितासंग्रह म्हणजे 'अवघाची काळोख' टाकावा चिरुन,उरावे पुरून इही लोकी..असा वेदनेचा हुंकार देत ही कविता आली आहे.'सभोवतालचा काळोख भेदून, उजेड वाट शोधू पाहणाऱ्या प्रत्येकास...ही अर्पण पत्रिका म्हणजे एक सृजनशील प्रेरणा प्रेरक शक्ती आहे.या कवितेचा मर्मग्राही आस्वादक स्वानंद म्हणजे ही एक गेय कविता आहे.व मुक्त व्यक्तछंद ती मनात रुजत जाते मनाला शब्द भुरळ घालते अवघाची काळोख डोळ्यात दाटला.देहाच्या राऊळी दगडं फुटला.मनाला संवेदनेचा शब्द पाझर फोडत ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल ठणक घेऊन आलेली आहे.कवी सत्य कुटे म्हणजे "मित्रा!कसे सांगू तूला/तिच्या सुखसंपन्न सभोवतालातून गहाळ होत जाणाऱ्या या भणंग प्रवाश्याचे काळीज माखले मनोगत"हे मलपृष्ठ भावनेचा निचरा आहे.डोये, कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे "गात वाढलो गे माये! तुझ्या पुण्याचे दोहे/भुई ठाव घेता खेपी/तुला शोधतात डोये"(पृ.५)अशी तरलं काव्य भाव व्याकुळ करुन जातात.मनातले खोल स्नेहाचे झरे आटत चालले आहे.हा केवळ खेळ नाही तर हा मायाळू गोतावळा आहे.कोण कुणाची आठवण काढतो की नाही सारेचं रघतपारखेपणाचा कळस गाठला आहे.'आठवशील का रे?' अशी वेदनादायी कळ येऊन 'गळफास'आवळणारी कविता अतिशय संयत मनोभूमिकेतून येते."रान उजाड उजाड,मन भकास भकास, उभं वठलेलं झाडं, त्याला लागे गळफास"(पृ.११)अशी एक सृजनशील मनोज्ञ भावना अनावर होतेच पण 'जपू खोडांना,लख्ख चांदणे, शेवटी,काटाळ,या आयुष्याच्या पायवाटेवर चालताना पाप,पुण्याचा विचार करून जगण्याचा भार सांगणारी कविता.माय, गोंदण,हलकीशी आग,पत्रपेटी,मुके झोके,सखे,तू काळाला.. पळसाचे फुलं,नवे गाणे, निष्ठावंत वारकरी,वाडा या कवितेचा अनुबंध म्हणजे खरंच आज जे अस्सल जगण्यातलं मोलं गेलं आहे, माणुसकीचा दुर्मिळ दुरावा झाला आहे गावगाडा गेला आहे.म्हणून"मित्रा, तुझ्या गावात,जुना आहे का रे वाडा.गुंतलेले भावबंध, संपलेला गावगाडा"(पृ.२७)ही कविता जितकी संयत गेय स्वरूपात येते तितकी चं ती मुक्त व्यक्त होते यात 'चला!वृत्त सृष्टीला जपू या कवितेचा मर्मग्राही अनुबंध असा की आजच्या समकालीन वास्तवाचे भान देऊन जाते.वर्तमानपत्र त्याला संजीवनी मिळाली पाहिजे.वर्तमानाची आर्त हाक ही कविता देते.'नवं असं काहीच नाही' पण काही अफलातून अफती येतात.यातून कवीला शब्द सारथी साथ देतात.हा वेगळाचं भंयकराचा काळोख आहे इथे ज्यांनी तथागतांच्या सम्यक संबुध्दांच्या विचारांची बांधिलकी ठेवली तरचं मन:शांती लाभेल कारण मोह,माया, जिव्हाळा आपूलकी ही आता क्रुरकर्माने घेतली आहे कवी लिहितात "तू तत्वज्ञानी बुद्धांचा सम्यक मार्ग, निवडून चालू लाग/बुद्ध विहाराच्या दिशेने/अत्त दीप भव च्या जयघोषात.../तू समजून घे/मुक्ती पथे! अजूनही वेळ वेळ गेलेला नाही../तू आता हो पथिक/प्रज्ञा शील करुणेचा..."(पृ.३५) मनुष्य जन्माचे सार्थक झाले असे आहे.ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वर्तमानची ठणक व्यक्त करते.काटशेवर,खोडाला फांद्यांचा विचार करणे,मुळ्यांना झाडाचा विचार विस्तार करणे.बेभाव,या जगण्याच्या लढाईत जिंकणे किंवा बेभाव विकणे.गरीबीच्या वाट्याला काटेचं म्हणून पाऊस मरणाची देऊन जातो धऊस.इथे पाऊस :एक जीवघेणा संदर्भ.आत्महत्येचे विचार,हे ही तितकेच खरे, वास्तव मांडणारी ही वास्तववादी शेतकऱ्यांचा व सुशिक्षित बेरोजगारांच्या दु:खाची वेदना मुखर करणारी ही कविता आहे.'टिचभर पोट विरहित'गर्भस्थ मनाच्या अदृश्य भागात,निद्रेशिवाय संपते रात्र.ही अस्वस्थ मनानी सल म्हणजे 'अवघाची काळोख, भेदू अंतरी,मनाची जंतरी जिभाळू काढू!इतकी अस्सल ठणक ही कविता देऊन जाते.काय तर, टिचभर पोटासाठी.कुतहल, बहुदा, पंचनामा, गर्दीचा हंगाम या कवितेने समकालीन व्यापकता व परिप्रेक्ष्यात डोळसपणे विचार अभिव्यक्ती मांडली आहे.कारण हा मानवी मनाच्या खोल तळाशी हा प्रश्ननांकित पंचनामा चालू आहे.या गर्दीच्या हंगामात माणूस माणसावरचं उठला आहे.कुणाही आपल्या स्वत:ची ओळखच राहिली नाही म्हणून हा अवघाची काळोख दुर झाला पाहिजे असे सुतोवाच ही कविता देऊन जाते.कवी सत्य कुटे यांच्या मनस्वी मनात अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक समृद्ध सकारात्मक विचारधारेची पेरणी करणारी जाणिव आहे म्हणून या कवितेचा आत्मा हा मातृह्दयाचा आहे.या सभोवतालच्या घटांकाविषयीची सुक्ष्म चिंतन चिकित्सक अभ्यासक वृत्तीने ते पाहतात.हा काळोख भेदून नवा उजेड ही कविता देते.इथे दु:खाचे रडगाणे नाही.तर सकारात्मक निर्धार शब्दांगार देऊन जाणारी ही कविता आहे.जसे'का◌ॅकटेल'या कवितेचा मर्मग्राही अनुबंध असा "मुर्दाड व्यवस्थेचे आणि होतात व्यथित मांडतात सिद्धांत/आपल्या भणंग तर्र अवस्थेचा/का◌ॅकटेल कार्यकर्ते"(पृ.५३)ही संमिश्र झिंगाट व्यवस्था कवीची सटक प्रतिक्रिया आहे.आता घोकंपट्टी, बोटभट्टी झाली आहे सतत मोबाईल स्क्रीनवर तो अहोरात्र टकुरं चालवतो आहे.प्रस्तूत कविता ही अनिवार्य प्रश्नांची नुस्ती नुस्ती घोकंपट्टी,मैत्री म्हणजे कधी बो, कट्टीबट्टी, सोबत खाल्लेली ईमली खट्टी अशी ही बालपणीच्या आठवणी जाग्या करणारी कविता आहेच.'दबा धरून'.."मित्रा!तू आहेस हक्काच सख्खा /म्हणून करतं रहातो मन हलके अधूनमधून.. नाही तरी काळ टपालच आहे/आयुष्य पुर्णविरामासाठी/कधीचाच दबा धरून"(पृ.५७) हेच मैत्रीचे नाते श्रेष्ठ आहेच तीच खरी संपत्ती आहे जिथे मन गहिवरून येते.तर आजच्या समकालीन वास्तवाचे सम्यक दृष्टीकोन ही कविता देऊन जाते.'पावसाचे छप्पर,तो काही संदर्भ,फावला वेळ,या कवितेचा अनुबंध म्हणजे नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय भावनेतून आपल्या काव्यामय भावना ते व्यक्त करतात."मित्रा, खूप काही लेखन प्रकल्प/माझ्या मनातले,कायमचे प्रलंबित आहेत/मीच लिहू शकेल असे,/फावला वेळ मिळत नाही,/एवढीच खंत आहे,ऐक मित्रा!/अजून मी जिवंत आहे"(पृ.६४) कवीवर्य शब्द स्नेही सत्य कुटे यांनी हा अनुभव अवघाची काळोख दुर करणारी एक सृजनशील सकारात्मक विचारधारेची ही शिदोरी घेऊन कवी आले आहेत.कवितेने काय दिले"तू असते कधी गझल.शायरालाही लाजवणारी.कधी असतेस तू अंभग,मला संत बनवणारी"अशी ही काव्य कलाकृती अत्यंत मनस्वी झाली आहे.कवीकुलवंत,भाग्यवंत, शब्दशिलवंत व्हावा ही सविनय शुभेच्छा.

**पुस्तक:-अवघाची काळोख (कवितासंग्रह)कवी लेखक:-सत्य प्रयाग कुटे प्रकाशन:-अभिव्यक्ती प्रकाशन,चिखली प्रकाशक:-रेणूकादास मुळे प्रथमवृती:-२० मार्च २०२६(चवदार तळे सत्याग्रह स्मृती)मुखपृष्ठ:-रवींद्र खानंदे अमरावती निर्मिती मूल्य:-१२०/पुस्तक**



**परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना**

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903